दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक ३३२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२५ फेब्रुवारी २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

८ हजारांहून अधिक नवे करोनारुग्ण, ८० मृत्यू

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यातील करोना बाधित रुग्णांची वाढ झपाट्याने होऊ लागली असून आज दिवसभरातील रुग्णवाढीचा आकडा चिंतेत भर टाकणार आहे. आज दिवसभरात तब्बल ८ हजार ८०७ इतक्या नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. काल ही संख्या ६ हजार २१८ इतकी होती. हा फरक २ हजार ५८९ इतका आहे. तर आज केवळ २ हजार ७७२ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत.

राज्यात कालच्या तुलनेत ॲक्टीव्ह रुग्णांची संख्या वाढून ती आज एकूण ५९ हजार ३५८ इतकी झाली आहे. राज्यातील प्रमुख शहरांचा विचार केल्यास मुंबईत ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या वाढली असून ती ६ हजार ९०० इतकी झाली आहे. तर ठाण्यात ही संख्या ६ हजार ५५२ इतकी. तर, पुण्यात ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या १० हजार ४२७, नाशिक येथे १,७६५, अहमदनगर येथे १,१३२, औरंगाबाद येथे १,५५९, नागपूर येथे ७ हजार ८५१, कोल्हापूर येथे २२६ इतकी आहे. राज्यात सर्वात जास्त ॲक्टिव्ह रुग्णसंख्या पुण्यात असून सर्वात कमी रुग्णसंख्या गडचिरोली आहे. येथे ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या ८४ इतकी आहे.

श्रीवर्धन व मुरुड-जंजिराला 'ब वर्ग' पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याविषयीचा शासन निर्णय जारी

पालकमंत्री आदिती तटकरेंचे जिल्ह्याच्या पर्यटनवाढीच्या दृष्टीने उल्लेखनीय यश

दै.रायगड नगरी । अलिबाग

जिल्ह्यातील श्रीवर्धन व मुरुड-जंजिरा या शहराला 'ब वर्ग' पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात येत असल्याची घोषणा काही दिवसांपूर्वी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी केली होती. श्रीवर्धन या शहराला 'ब वर्ग' पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात यावा, यासाठी पर्यटन राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी पुढाकार घेतला होता. मुंबई, पुण्यापासून जवळ असलेल्या रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळांच्या विकासास चालना देण्याच्या दृष्टीने नुकताच श्रीवर्धन व मुरुड-जंजिरा या शहरास 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळाल्याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन हे पर्यटनस्थळ मुरुड जंजिरा किल्ल्याच्या दक्षिणेस सुमारे २० कि.मी. अंतरावर तर दक्षिण काशी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र हरिहरेश्वरच्या उत्तरेस सुमारे ४.८०कि.मी. अंतरावर अरबी समुद्र किनारी स्थित आहे. या पर्यटनस्थळाच्या ठिकाणी व परिसरामध्ये असलेली प्राचीन मंदिरे, श्रीक्षेत्र हरिहरेश्वर, दिवे आगार व इतर आसपासच्या क्षेत्रातील धार्मिक स्थळे आणि विस्तीर्ण समुद्र किनारा यामुळे श्रीवर्धन या पर्यटनस्थळास मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देतात.

श्रीवर्धन हे पर्यटनस्थळ अरबी समुद्र किनारी प्राचीन काळापासून वसलेले शहर आहे. या शहरास सुमारे ४ कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. या पर्यटनस्थळाच्या उत्तरेस तांबडी डोंगर, एका बाजूस समुद्र आणि दुसऱ्या बाजूस उंच डोंगर तसेच लगतची पूर्वेकडील काळींजे खाडी यामुळे श्रीवर्धन येथील हवामान कायमच शीत स्वरुपाचे असते.

रायगड जिल्ह्यातील मुरुड–जंजिरा या पर्यटनस्थळाची भौगोलिक स्थिती आकर्षित करणारी आहे. शहरात प्रवेश करतानाच नबाबी नजाकतीचा राजवाडा दृष्टीस पडल्यानंतर पुढे अथांग अरबी समुद्र व याच सागरात घट्ट पाय रोवून उभा असलेला इतिहासाचा मुख्य साक्षीदार पद्मदूर्ग तसेच विलोभनीय मुरुड समुद्र किनारा नजरेस पडतो, त्यानंतरच शहराचे वेशीवर दर्शन होते ते श्री कोटेश्वरी ग्रामदेवतेचे. तसेच शहराचे मध्यवर्ती ठिकाणी श्रीभोगेश्वर मंदिर तसेच श्री लक्ष्मीनारायण व इतर पुरातन मंदिरे आहेत. त्याचप्रमाणे मुरुड शहरात सन १७५० च्या सुमारास निसर्गरम्य टेकडीच्या माध्यावरील सपाट मैदानावर बांधण्यात आलेले ऐतिहासिक श्री दत्तमंदिर आहे. तसेच त्याच टेकडीवर मुस्लिम धर्मियांचे पवित्र स्थान अत्यंत सुंदर वास्तू म्हणजे इदगाह येथून शहराचे विहंगम दृष्य दिसते. शहरापासून एकदरा गा–वानजीक खोराबंदर आहे. तेथूनही जंजिरा किल्ला समोरच दिसतो.

मुरुड–जंजिरा या पर्यटनस्थळाच्या ठिकाणी जंजिरा हा ऐतिहासिक जलदुर्ग असल्याने या किल्ल्यास आवर्जून भेट देण्यासाठी साधारणपणे माहे, ऑक्टोबर ते मे महिन्यांत फ्रान्स, जर्मनी, इंग्लड, पॅरीस, ऑस्ट्रेलिया व इतर देशामधून विदेशी पर्यटक येतात. हा जलदूर्ग तसेच मुरुड बीचवर दरवर्षी सुमारे ५ ते ६ लक्ष पर्यटक भेट देतात. मुरुड तालुक्यातील काशिद बीच, नांदगाव गणपती मंदिर, मुरुड बीच, जंजिरा किल्ला व सिध्दीनबाब राजवाडा या ठिकाणी आलेला प्रत्येक पर्यटक हा मुरुड शहराला भेट देतो.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्दे शानुसार जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या प्रस्तावान्वये श्रीवर्धन व मुरुड–जंजिरा, या शहरास 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची शिफारस करण्यात आली होती. श्रीवर्धन व मुरुड–जंजिराला दरवर्षी अंदाजे ८ ते १० लक्ष पर्यटक भेट देतात. या पर्यटनस्थळाचे राज्यस्तरीय महत्व, या पर्यटनस्थळास भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या, ऐतिहासिक व भौगोलिक महत्त्व इत्यादी बाबी विचारात घेता, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.२५ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील 'ब' वर्ग पर्यटनस्थळे घोषित करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या निकष व कार्यपध्दती नुसार श्रीवर्धन व मुरुड–जंजिरा या पर्यटनस्थळास 'ब' वर्ग पर्यटनस्थळ म्हणून घोषित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

या पार्श्वभूमीवर शासनामार्फत येथे विविध पर्यटन सुविधा, पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येईल. यामुळे येथील पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असा विश्वास पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

संक्षिप्त...

राज्यात वीजदर कमी होणार

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यात विजेचे दर कमी करण्यासाठी व शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज पुरवठा देण्यासाठी नियोजन करण्याचे निर्देश राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत महावितरण कंपनीला दिले. अन्य राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रात औद्योगिक ग्राहकांसाठीचे वीजदर जास्त असल्याने राज्यात उद्योगधंदे वाढीस अडथळा निर्माण झाला आहे. त्यावर बोट ठेवत नितीन राऊत यांनी महत्त्वाचे निर्देश दिले. राज्यातील उद्योगांचे वीजदर कमी करणे गरजेचे आहे. त्यामुळे वीजदर प्रति युनिटमागे किमान एक रुपयाने कमी करण्यासाठी प्रयत्न करावे आणि सोबतच घरगुती वीज व वाणिज्यिक वीज वापराचे दरही कमी करण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देशही डॉ. राऊत यांनी यावेळी दिले. नवीन कृषिपंप वीज धोरणात शेतकऱ्यांना ८ तास वीज देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तथापि कृषिपंप वीज वाहिन्या अतिभारीत (ओव्हरलोड) होत असल्याच्या तक्रारी मिळत असल्याने वीज वाहिन्यांचे जाळे सक्षम करणे व रोहित्रांची संख्या व क्षमता वाढविण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम त्वरित करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. राज्यातील किती ठिकाणी आणि कोणते रोहित्र दिवसा ८ तास वीज देण्यास सक्षम नाही, हे शोधून त्यांच्या सक्षमीकरणासाठी कालबद्ध कृती कार्यक्रम तयार करण्यात यावा, असेही ऊर्जामंत्र्यांनी सांगितले.

श्रीवर्धन तालुक्याचा कोस्टल सर्किटमध्ये समावेश करून जास्तीत जास्त विकास करणार : खा.सुनील तटकरे

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

श्रीवर्धन मधील हरिहरेश्वर मंदिर, मुरुड येथील कड्यावरील गणपती, बाणकोट मधील देखील काही समुद्रकिनारी पर्यटनस्थळे आहेत. ज्यांचा समावेश कोष्टल सर्किटमध्ये करून घेणार असल्याची ग्वाही खा. सुनील तटकरे यांनी दिली. हरिहरेश्वर ग्रामपंचायत कार्यालय, हरिहरेश्वर शिवमंदिर परिसर सुधारणा, हरिहरेश्वर माध्यमिक विद्यालय संगणक कक्ष प्रयोगशाळा कक्ष उदघाटन खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते झाल. यावेळी विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष महमद मेमन, तालुका अध्यक्ष दर्शन विच–ारे, हरिहरेश्वर सरपंच अमित खोत, सभापती बाबुराव चोरगे, सुरेश मांडवकर आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने भारतातील जागतिक दर्जाचे किनारे विकसित करण्यासाठी कोस्टल सर्किटची थीम हाती घेतली आहे. यामध्ये श्रीवर्धन, मुरुड, बाणकोट येथील किनाऱ्यांचा कोस्टल सर्किटमध्ये समावेश करून या भागातील पर्यटन स्थळांचा विकास झपाट्याने करता येईल असे वक्तव्य खा. सुनील तटकरे यांनी केले. खासदार निधीतील पहिला काम व पहिला उदघाटन हरिहरेश्वर येथील ग्रामपंचायत कार्यालयाचा असल्याचा आवर्जून उल्लेख यावेळी खा. तटकरे यांनी केला. ..../२

मांडूळ साप खारघर पोलिसांनी केला हस्तगत; एक आरोपी ताब्यात

दै.रायगड नगरी । पनवेल

मांडूळ सापामुळे धनदौलत व ऐश्वर्य प्राप्त होते असे लोकांना आमिष दाखवून त्यांना मोठ्या किंमतीत त्याची विक्री करून लोकांची फसवणूक करणाऱ्या एका सराईत गुन्हेगारास खारघर पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे.

खारघर परिसरात द क्राऊन बिल्डींगजवळ एक इसम २ कोटींचा मांडूळ साप विक्रीस घेऊन येणार असल्याची माहिती खारघर पोलिस ठाण्याचे वपोनि शत्रुघ्न माळी यांना मिळताच त्यांनी याबाबतची माहिती वरिष्ठांना देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक मपोनि विमल बिडवे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे पोलिस उपनिरीक्षक ..../२

महापालिका आयुक्तांनी महाविकास आघाडी शिष्टमंडळास दिले कोविड रुग्णालय चालू करण्याचे आश्वासन

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांनी लवकरच कोविड रुग्णालय सुरू करतो असे आश्वासन महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाला आज दिले आहे.

आज आयुक्त सुधाकर देशमुख यांची महाआघाडीच्या शिष्टमंडळाच्या वतीने पनवेल उरण महाविकास आघाडीचे नेते आ.बाळाराम पाटील, अध्यक्ष पनवेल उरण महाविकास आघाडी बबनदादा पाटील, जिल्हाध्यक्ष काँग्रेस आर सी घरत, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस सतीश पाटील, सुदाम पाटील जिल्हा कार्याध्यक्ष काँग्रेस, शिवदास कांबळे जिल्हा कार्याध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस, गणेश कडू जिल्हा सहचिटणीस शेकाप, निर्मला म्हात्रे महिला जिल्हाध्यक्षा काँग्रेस, लतीफ शेख शहर अध्यक्ष पनवेल, विजय भोईर युवा नेते शेकाप यांनी घेवून कोविड रुग्णालया संदर्भात तसेच मालमत्ता कर, कारडीओ रुग्णवाहिका व विविध विषयावर चर्चा केली असता त्यांनी पुढील आठवड्यात कोविड रुग्णालय सुरू करण्याचे आश्वासन दिले व मालमत्ता कर संदर्भात सर्वपक्षीय नेते, महापौर, अधिकारी, सामाजिक संघटना व रहिवाशी यांची सयूंक्त बैठक लवकरच लावण्यात येईल याची ग्वाही दिली.

सिडकोकडून अतिथी गृह उभारणीसाठी खारघर येथील भूखंड सिक्कीम आणि त्रिपुरा राज्यांना देण्यात येणार

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

सिक्कीम आणि त्रिपुरा शासनाने केलेल्या विनंतीनुसार सिडकोकडून खारघर येथील सेक्टर–१६ मधील भूखंड क्र. १८ त्रिपुरा सरकारला तर भूखंड क्र. १९ आणि २० सिक्कीम सरकारला अतिथी गृह/विक्रयालयाच्या (स्टेट गेस्ट हाउस/एम्पोरियम) उभारणीसाठी वाटपित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर भूखंड क्र. १८ चे क्षेत्रफळ १९७०.३६ चौ.मी. इतके आहे, तर भूखंड क्र. १९ आणि २० या भूखंडांचे एकत्रित क्षेत्रफळ ४००० चौ.मी. इतके आहे.

सदर भूखंडांचे वाटप हे नवी मुंबई भूमी विनियोग (सुधारित) अधिनियम, २००८ मधील तरतुदींनुसार ६० वर्षांच्या भाडेपट्ट्याने करण्यात येणार असून या भूखंडांकरिता १ इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहणार आहे. संबंधित भूखंडांकरिता सिक्किम सरकारला रु. ९,९३,०८,०००/– तर त्रिपुरा सरकारला रु. ४,८९,१८,१२७.७२/– भाडेपट्टा अधिमूल्य ..../२

> सिडकोकडून अन्य राज्यांच्या सरकारांना भूखंड वाटपित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे, त्रिपुरा आणि सिक्किम सराकारलाही राज्य अतिथी गृहाच्या उभारणीसाठी भूखंड वाटपित करण्यात येणार आहेत. यामुळे संबंधित राज्यांना नवी मुंबईमध्येही त्यांच्या संस्कृतीचे जतन करता येईल; तसेच सदर अतिथीगृहे ही या राज्यांचे प्रतिनिधीत्व करणारी ठरतील.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

उरण यंदाही पाण्याखाली जाणार ; प्रशासनाचे दुर्लक्ष

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

उरण तालुक्यातील अनेक गावांत मागील वर्षी पुर परिस्थिती निर्माण झाली होती. या पुर परिस्थितीवर उपाययोजना करण्या ऐवजी स्थानिक ग्रामपंचायत, महसूल अधिकारी, जेएनपीटी तसेच सिडको अधिकारी यांनी चक्क नाल्यात, खाडी किनाऱ्यावर तसेच रस्त्याच्या कडेला दगड मातीचा भराव करण्यास आणि नैसर्गिक नाल्यावर व्यवसायिकांना बांधकाम करण्यास परवानगी दिल्याचे चित्र सर्रास पाहावयास मिळत आहे. त्यामुळे यंदा ही पावसाळ्यात उरण पाण्याखाली जाणार अशी भिंती रहिवाशी व्यक्त करत आहेत.

उरण तालुक्याच औद्योगिकरण झपाट्याने वाढत आहे. परंतु येथील प्रशासनाच्या

नियोजन शुन्य कारभारामुळे त्याचा फटका हा उरण शहर आणि गावोगावच्या रहिवाशांना पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पुर परिस्थितीच्या माध्यमातून बसत आहे. एकंदरीत अशा वाढत्या औद्योगिकीकरणामुळे, नागरीकरणामुळे दरवर्षी थोडा पाऊस जरी पडला ..../२

राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी महाडमधील मौजे नाते येथील जागा हस्तांतरित

दै.रायगड नगरी । अलिबाग

सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन तालुका लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय महाड यांनी राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना नाते, ता.महाड, जि.रायगड या इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी केली होती. जिल्ह्याच्या पशूधन क्षेत्रा–तील विकासाच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्वाची असल्याने पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते.

त्यानुसार जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी मौजे नाते, ता.महाड, जि.रायगड येथील गट नं.९५५ एकूण क्षेत्र १–३४–०० हेक्टर आर. पैकी ०–०५–०० हे.आर.ही जमीन ग्रामपंचायत नाते यांच्याकडून शासनाकडे पूर्नग्रहण करण्यात येऊन महसूल मुक्त व सारामाफीने पशुसंवर्धन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, .../२

नैनामध्ये अतिक्रमण विभागाची धडक कारवाई

दै.रायगड नगरी । पनवेल

नैना विभागात अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्यांविरोधात आज धडक कारवाई करून सदर बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले.

तालुक्यातील आकुर्ली गावाच्या हद्दीत नैना विभागात रस्त्याच्या मधोमध एक बांधकाम उभारण्यात आले होते. या बांधकामाविरोधात आज अतिरिक्त जिल्हाधिकारी खडके यांच्या मार्गदर्शनाखाली नैना अतिक्रमण विभागाचे सहा.नियंत्रक अनधिकृत बांधकामाचे अधिकारी गणेश झिने, खांदेश्वर पोलीस ठाण्याचे गुन्हे विभागाचे पोलीस निरीक्षक ढाकणे, पोलीस अधिकारी कर्मचारी, सुरक्षा रक्षक, नैना अभियांत्रिक विभागाच्या राजूरकर आदींच्या पथकाने सदर विभागात आज ही कारवाई केली. यापुढे सुद्धा अशा प्रकारची बेकायदेशीर बांधकामे पाडण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

श्रावणबाळ आणि रामराज्य

उभ्या महाराष्ट्राच्या नशिबात आजच्यासारखे दिवस वारंवार येत नाहीत, हे मान्यच करायला हवे. गेले चौदा दिवस आपल्या आई-वडिलांच्या व कुटुंबीयांच्या सेवेत घालविलेला एक 'श्रावणबाळ' आज महाराष्ट्राने बघितला. महाराष्ट्रातील माध्यमे आणि समाजमाध्यमे इतकी कर्मदरिद्री, की त्यांना सरळ, चांगले, निर्मळ काही दिसतच नाही. उगाचच वनमंत्री संजय राठोड यांच्याबद्दल काहीबाही बरळत राहतात. राठोड यांनी आज पोहरादेवीच्या पायाशी जाऊन, 'आपली कारकीर्द संपविण्याचे कारस्थान केलेत तर याद राखा,' असा सज्जड दमही या सगळ्यांना दिला आहे. आजकाल इतका चारित्र्यवान राजकारणी अपवादानेच बघायला मिळतो. बरे इतकेच नव्हे, तर आज राठोड यांना पाठिंबा देण्यासाठी स्वयंस्फूर्तीने हजारो लोक जमले होते. आता करोना वगैरे गोष्टी गेले वर्षभर सुरूच आहेत; पण आपल्या समाजाच्या श्रावणबाळासारख्या गुणवान नेत्यावर सगळी माध्यमे टीका करीत असताना, त्याला पाठिंबा देण्यासाठी एकत्र यायचे नाही, मग कधी यायचे, हा प्रश्न याबाबत महाराष्ट्रातील इतर जनतेला कसा पडत नाही, याचेच खरे तर आश्चर्य वाटायला हवे. उगाचच गर्दी जमली म्हणून लोक आपासांतच नव्हे, तर दूरचित्रवाणी वाहिन्यांवर चर्चा करतात. त्यामागच्या भावना कोणीच लक्षात घेत नाही. अगदी राठोड यांच्या पक्षाचे नेते असलेले मुख्यमंत्रीदेखील ही लोकभावना लक्षात न घेता, 'संबंधितांवर कारवाई करा,' असे आदेश देतात. याला काही अर्थ आहे का? गेल्या अनेक वर्षांत महाराष्ट्रात खरे तर आधुनिक रामराज्यच सुरू आहे. सर्व जनसेवक अगदी मनापासून काम करत आहेत. सर्वसामान्य जनतेचा उद्धार व्हावा, यासाठी ते तनमन अर्पण करून झिजत आहेत; पण इथली जनताच इतकी करंटी आहे, की त्यांना काही म्हणता काही पटत नाही. त्यातच माध्यमे तर फारच कर्मदरिद्री. प्रत्येक गोष्टीत काही तरी वाईटच शोधतात. हे काही आजचे नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून खरे तर असेच रामराज्य सुरू आहे. महाराष्ट्रात पोषण आहारात भ्रष्टाचार झाला, म्हणून काही वर्षांपूर्वी आरडाओरड झाली. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी या चिक्कीच्या पोषण आहारामधील सगळी आहारमूल्ये व्यवस्थित असून, सर्व संबंधितांचे पोषण योग्य पद्धतीने झाले असल्याची चिठ्ठी दिली, तरीही माध्यमांनी टीकाच केली. त्यानंतर नजरचुकीने कोणी मंत्र्याकडून काही तरी जमीन खरेदी-विक्रीमध्ये पुढे मागे झाले. आता इतक्या मंत्रालयांचा कारभार सांभाळायचा, म्हणजे थोडे-फार पुढे मागे होणारच. त्यामध्ये चुकून आपल्या पत्नीच्या नावाने काही खरेदी झाली, तर त्यावरून एवढा गहजब करण्याची काय गरज? त्याशिवायही दोन-चार जणांकडून तथाकथित गैरव्यवहार झाल्याची टीका माध्यमांनी केली. आता त्याच्याकडे काय लक्ष द्यायचे? त्यांच्याही मागे त्यांचा समाज आहे. तेही दोन-चार वेळा निवडून आलेले आहेत. मग काय चिठ्ठी देण्याचा सपाटाच सुरू झाला. आता एकमेकांच्या संगतीत पंचवीस वर्षे संसार केल्यानंतर वाण नाही, तर गुण लागणारच. हे माध्यमांनी समजून नको घ्यायला? गैरव्यवहारांचे आरोप झाले, म्हणून अनेक महिने तुरुंगवास भोगायला लागला असला, तरीही जनसेवेची मनोभावना बिलकूल कमी होत नाही. सध्याच्या सरकारमध्ये सहभागी होऊन त्याचे ठळक उदाहरण दाखविण्याचा प्रयत्न एक मंत्रीमहोदय करत असले, तरीही माध्यमे त्याची दखलच घेत नाहीत. उगाचच मागचे काही तरी काढून उगाळत बसतात. महिलांबाबत अतिशय पुरोगामी धोरणे असलेला पक्ष सत्तेत आल्यानंतर, महिलांवर अन्याय होईलच कसा? पण एका महिलेने एका मंत्र्याच्या विरोधात अत्याचार केल्याचा अर्ज थेट पोलिसांमध्येच दिला. आता रामराज्यामध्ये असे काही होण्याची शक्यताच नसल्याने, या महिलेचेच चारित्र्य कसे योग्य नाही, याचे पुरावे गोळा करण्याची अहमहमिकाच लागली. त्यातच संबंधित समाजानेही या मंत्र्यांच्या मागे आपण भक्कमपणे उभे असल्याची ग्वाही दिली. आज तोच वारसा राठोड यांनी व त्यांच्या समर्थकांनी चालविला आहे. दोन आठवड्यांपूर्वी पूजा चव्हाण या तरुणीने पुण्यात आत्महत्या केली. त्यामध्ये राठोड यांचा संबंध असेलच कसा? हल्ली काय कोणीही मंत्र्यांबरोबरचे फोटो समाजमाध्यमांवर टाकतो. त्या तरुणीच्या मोबाइलमधील संभाषणांच्या काही फितीही समाजमाध्यमांवर फिरत आहेत; पण हे सगळे श्रावणबाळाच्या बदनामीसाठी चालले आहे. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे, या तरुणीच्या मृत्यूबद्दल सर्व समाजाला व खुद्द 'श्रावणबाळा'ला अपार दुःख झाले आहे. त्याची कोणी दखल घेणार की नाही? महाराष्ट्र पुरोगामी आहे वगैरे म्हणणाऱ्यांना ही आधुनिक रामराज्याची उपमा कदाचित पसंत पडणार नाही; पण या रामराज्याची व प्रभू श्रीरामचंद्रांच्या राज्याची तुलनाच होऊ शकत नाही, हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे.

जेएनपीटी जनरल कामगार संघटना पुढाकाराने कामगारांना मिळाली थकबाकी

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

जेएनपीटी टाउन शिप मधील कचरा,गारबेज उचलणाऱ्या कामगारांना कोणत्याही प्रकारची अग्रिमेंटची सुविधा उपलब्ध नव्हती अश्या कामगारांना मागील ५ वर्षा पासूनची थकबाकी मिळुन देण्याचे काम जेएनपीटी जनरल कामगार संघटनेने केले आहे. थकबाकी पोटी प्रत्येक कामगाराला सुमारे दीड लाख रुपये मिळवुन देण्याचे काम युनियन च्या माध्यमातून केले आहे.

जेएनपीटी च्या व्यवस्थापनाचा सतत युनियनने पाठ पुरावा करून कामगारांना न्याय मिळवुन देण्याचे काम केले आहे. कामगारांना न्याय मिळाला आहे .त्यामुळे कामगारांनी युनियन चे अध्यक्ष सुरेश पाटील, कार्याध्यक्ष सुधिर घरत, जनरल सेक्रेटरी जनार्दन बंडा, सह सेक्रेटरी धर्माजी पाटील, माजी विश्वस्त रवी पाटी, आदींचे जेएनपीटी टाऊनशिप येथील जेएनपीटी जनरल कामगार संघटनेनच्या कार्यालयात जाऊन आभार मानले

जेएनपीटी जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगारांना न्याय मिळवून देण्याचे काम नेहमीच केले जाते. आमच्या युनियनचे सल्लागार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांचे मार्गदर्शन व सहकार्य नेहमीच लाभत आहे.

पुढील काळात चांगल्या प्रकारे कामगारांना न्याय मिळवून देण्याचे काम युनियन च्या माध्यमातून केले जाईल. असे प्रतिपादन जेएनपीटी जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी केले.

११ वर्षाच्या मुलाचा शॉक लागून मृत्यू

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

लोखंडी परांचीमुळे उपरी विद्यत वाहिनीचा शॉक लागून बेघर मुलाच्या मृत्यूची घटना सोमवारी सकाळी ऐरोलीत घडली. इमारतीच्या दुरुस्ती कामासाठी उभारलेल्या लोखंडी परांची सोबत हा मुलगा खेळत असताना वरचे टोक वायरीला टेकल्याने हि दुर्घटना घडली.

ऐरोली सेक्टर ८ येथील शिवशंकर प्लाझा या इमारतीच्या आवारात रस्त्यालगत हा प्रकार घडला. या इमारतीच्या तळमजल्यावरील व्यवसायिक गाळ्यांच्या डागडुजीसाठी सुमारे ३० फूट उंच लोखंडी परांची उभारण्यात आली होती. हि परांची इमारतीच्या आवारात उभी करण्यात आली होती. सोमवारी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास परिसरात सिग्नलवर खेळणी विकणारा सुमारे ११ वर्षाचा मुलगा त्याठिकाणी आला. तो परांची सोबत खेळत असताना ती सरकत रस्त्याच्या कडेला गेली. त्यामुळे परांचीचा वरचा भाग उपरी विद्युत वायरीला चिटकला असता या मुलाला विजेचा शॉक लागला. उपरी विद्युत वायर हि उच्च दाबाची होती. त्यामुळे तिच्यातला विद्युत प्रवाह लोखंडी परांचीमध्ये उतरल्याने क्षणात त्या मुलाच्या शरीराने पेट घेऊन जागीच त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, महावितरण अधिकारी व रबाळे पोलिसांनी त्याठिकाणी जाऊन पाहणी केली. उपरी वीजवाहिनीतीलवीज पुरवठा बंद केल्यानंतर परांची त्या ठिकाणावरून हटवण्यात आली. तर तिथल्या सीसीटीव्हीत संपूर्ण प्रकार उघड झाला असल्याचे वरिष्ठ निरीक्षक योगेश गावडे यांनी सांगितले.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

करंजाडे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक मंडळाच्यावतीने रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीर

दै.रायगड नगरी । पनवेल

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त करंजाडे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक मंडळाच्यावतीने रक्तदान शिबीर व श्री समर्थ क्लिनिकच्या माध्यमातून आरोग्य तपासणी शिबीर पार पडले.

यावेळी होमग्लोबीन, मधुमेह, रक्तदाब, हाडांची घनता, नेत्र तपासणी करण्यात आली. त्याचा १६८ नागरिकांनी लाभ घेतला तसेच ७० रक्तदात्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सदिच्छा भेट देऊन शुभेच्छा दिल्या. हा सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. संकेत पवळ, जीवन चाळके, शैलेश चव्हाण, अमित यादव, विनायक पोपट, विनोद खोडदे, भूषण चाळके, योगेश फाफाळे, शैलेश आचार्य, राजेंद्र घोडके आदीं मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : आष्टे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिल हे खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

मिळकतीचे वर्णन
मौजे : आष्टे, ता.पनवेल, जि.रायगड

मौजे	गट नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पैसे
आष्टे	६७/१	०-३०-९०	५.८७
		पो.ख.०-०४-०० एकूण ०-३४-९०	

सदरहू जागा, जमिनी व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती ह्या निर्वेध व बोजाविरहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहित धरुन आम्ही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे अशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २३/०२/२०२१

सही/-
अॅड.वीरा म्हात्रे
शॉप नं.१२, जॉमेट्रिक्स सिल्व्हरक्रेस्ट, प्लॉट नं.२९, सेक्टर २५, कामोठे, खांदेश्वर रेल्वे स्टेशन जवळ, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०९
मो.नं.८८७९४७०२११

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे : कोळवडी, ता.पनवेल, जि.रायगड येथील गट नं.६१, हि.नं.२ ड (पूर्वी सदरचे कोळवडी हे गांव पालेबुद्रुक गावात समाविष्ट असल्याने सदर मिळकतीचा पूर्वीचा पाले बुद्रुक गावातील स.नं.१२०, हि.नं.२ ड असा होता), लागवडीयोग्य क्षेत्र ०हे-४२आर.३० चौ.मी. अधिक पो.ख.०हे-०३ आर.७० चौ.मी. मिळून एकंदर क्षेत्र ०हे.-४६आर.०० चौ.मी., आकार रु.९ पै.६३ ही संपूर्ण मिळकत, सदर मिळकतीचे सामाईक मालक व कब्जेदार १) लक्ष्मण अनंत पाटील, २) अरुण अनंत पाटील, ३) जय अनंत पाटील, ४) देवेंद्र अनंत पाटील आणि ५) सुरेखा अशोक पाटील यांच्याकडून आमच्या अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु, हुकूनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील १) लक्ष्मण अनंत पाटील, २) अरुण अनंत पाटील, ३) जय अनंत पाटील, ४) देवेंद्र अनंत पाटील आणि ५) सुरेखा अशोक पाटील यांचे सामाईक मालकी हक्क-हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.२४/०२/२०२१

सही/-
श्री.संदीप रमाकांत जगे, अॅडव्होकेट
फ्लॅट नं.०२, जयनगर 'ए' को.ऑप. हौ.सोसा.लि., कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१०२०६, जि.रायगड
फोन नं. (०२२) २७४५४५४८
मोबाईल नं.०९३२४४५४५४८

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : दहिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत ही श्री.मनोहर शंकर पाटील यांच्या मालकी हक्काची व ताबेकब्जातील असून सदरची शेतजमीन मिळकत आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

मिळकतीचे वर्णन
मौजे : दहिवली, ता.पनवेल, जि.रायगड

स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पैसे
३०	-	०-२५-५०	५.००
३१	२	०-२१-७०	५.१३

सदरहू जागा, जमिनी व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती ह्या निर्वेध व बोजाविरहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहित धरुन आम्ही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे अशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/०२/२०२१

सही/-
अॅड.साजिद एम.शेख
पुष्कर सोसा.फ्लॅट नं.२, प्रांत ऑफिस जवळ, जुना ठाणा नाका रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
मो.क्र.८४५०९२४९३४

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : पुष्पक वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील व्यक्तीच्या नावे असलेली प्रत्यक्ष ताबेकब्जातील, तसेच खुद्द मालकी हक्काची खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल श्री.निनाद सुनील केणी व श्रीमती.सुगंधा सुनील केणी यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

जमीन मिळकतीचे वर्णन
मौजे : पुष्पक वडघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

मालकांची नावे	प्लॉट नंबर	सेक्टर	एकूण क्षेत्र
श्री.विठ्ठल पंढरीनाथ मुंगाजी	७४	आर-५	७०.०० स्क्वेअर मीटर

सबब वर नमूद जमीन मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही नमूद केलेल्या भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि.२४/०२/२०२१

सही/-
अॅड.संदीप ल.डोंगळे
गाळा नं.२४, जनता बाजार, रोड क्र.४, सुर्या हॉटेल समोर, सेक्टर १८, नवीन पनवेल (पू.), ता.पनवेल, जि.रायगड-४१२०६

पृष्ठ क्र.१ वरुन...

जास्तीत जास्त विकास करणार : खा.सुनील तटकरे

हरिहरेश्वर देवस्थानाला भेट देण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची काळजी घेण्याची जबाबदारी आपली आहे. मोबाईल आणि इंटरनेटच्या जमान्यात देखील आमची संस्कृती कशी चिरकाळ टिकणारी आहे हे हरिहरेश्वर ला आल्यावर दिसत. हरिहरेश्वर मंदिराच्या परिसरात औषधी व सुगंधी वनस्पतींची लागवड करण्याचं फ्रॉजेक्त आपण हाती घेत आहोत. यातून येणाऱ्या पर्यटकांना इथलं गुण वैशिष्ट काय आहे हे समजेल याप्रोजेक्ट साठी लवकरच सामाजिक वनीकरण खाता फॉरेस्ट खाता यांची संयुक्त बैठक आयोजित करणार असल्याचे खा. सुनील तटकरे यांनी सांगितले. उदघाटन प्रसंगी झालेल्या सभेस संभोधीत करताना आपल्या परिसरातील जनजीवन सुखरूप व सुखावं चित्र पाहायला मिळत आहे. कालभैरवाच्या कृपाशीर्वादाने तोंडावरील कापड जरा खाली जाऊदे आणि एक मेकांना व्यवस्थित पाहून मनमुराद गप्पा मारता याव्यात अस साकडं काळभैरव चरणी सुनील तटकरे यांनी घातलं.

मांडूळ साप खारघर पोलिसांनी केला हस्तगत

नरेंद्र बेलदार व त्यांच्या पथकाने द क्राऊन बिल्डींग से.-१५, खारघर येथे सापळा रचून त्या बिल्डींगमधून बाहेर पडणाऱ्या आरोपी किशन गोविंद पाटील (वय-४०, रा.-भिवंडी) या इसमास ताब्यात घेऊन त्याच्याकडील बॅगची तपासणी केली असता त्याच्या बॅगेत जवळपास २ कोटींचे मांडूळ साप ज्याचे वजन ५ किले २४० ग्रॅम इतके आहे. हे ताब्यात घेऊन याबाबत सदर आरोपीविरोधात भादंवि कलम ४२०, ५११ सह वन्यजीव प्राणी १९७२ कलम ५१, ५२ प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

भूखंड सिक्कीम आणि त्रिपुरा राज्यांना देण्यात येणार

देय असणार असून किरकोळ शुल्क, जीएसटी आणि अन्य संबंधित शुल्क हे स्वतंत्ररीत्या भरावे लागणार आहेत.

सिडकोतर्फे १९९२ मध्ये वाशी येथील सेक्टर-३० मधील भूखंड विविध राज्यांच्या सरकारांना त्यांच्या राज्य अतिथीगृह/विक्रयालयाच्या उभारणीसाठी वाटपित करण्याकरिता धोरण तयार करण्यात आले होते. सिडकोतर्फे आतापर्यंत आसाम, गुजरात, मणिपूर, कर्नाटक, राजस्थान, पंजाब, मिझोराम, मेघालय, नागालँड इ. राज्यांना भूखंड वाटपित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, सिक्किम आणि त्रिपुरा सरकारांकडून करण्यात आलेल्या विनंतीनुसार सेक्टर-१६, खारघरमधील भूखंड क्र. १९ आणि २० आणि भूखंड क्र. १८ अनुक्रमे सिक्किम आणि त्रिपुरा सरकारच्या राज्य अतिथीगृह/विक्रयालयाच्या उभारणीसाठी देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

उरण यंदाही पाण्याखाली जाणार ; प्रशासनाचे दुर्लक्ष

तरी उरण शहर, इंदिरा गांधी रुग्णालय, चिरनेर, वेश्वी, विंधणे, चिर्ले, जासई, करळ, सोनारी, नवघर, बांधपाडा, बोकडविरा, फुंडे, चाणजे, केगाव, नागाव आणि जसखार ग्रामपंचायत हद्दीतील रहिवाशांच्या घरात कंबरभर पाणी साचून ठिक ठिकाणाचे रहदारीचे रस्ते पाण्याखाली जात आहेत.

यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायत, महसूल अधिकारी, जेएनपीटी तसेच सिडकोचे व्यवस्थापकीय अधिकारी हे पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पुर परिस्थितीच्या परिसराचा आढावा घेऊन कागदी घोडे नाचविण्यात तलीन होतात.त्यामुळे जिवीतहानी बरोबर वित्तहानीचा सर्रास सामना हा नाल्या काठावरील रहिवाशांना दरवर्षी सहन करावा लागत आहे.तरी यंदाच्या पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पुर परिस्थितीवर मात करण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायत, महसूल अधिकारी, जेएनपीटी तसेच सिडकोचे व्यवस्थापकीय अधिकारी यांनी गावोगावच्या नाल्यांची,खाडी किनाऱ्यावरील पाणी वाहून नेणाऱ्या नैसर्गिक स्त्रोतांची पाहणी करावी, तसेच गव्हाण फाटा ते विंधणे,दास्तान फाटा ते दिघोडे,कोप्रोली ते पिरकोन,खापटा पुल आणि उरण ते करळ पोलीस चौकी रस्त्याची पाहणी करुन सदर रस्त्याच्या मोरीच्या स्त्रोतांवर करण्यात आलेला दगड मातीचा भराव, नाल्यावरील बांधकामांचे अतिक्रमण हटविण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी पुर ग्रस्त रहिवाशी करत आहेत. नाहीतर यंदाही उरण पाण्याखाली जाणार अशी भिंती भयभीत झालेले उरणकर व्यक्त करत आहेत.

मौजे नाते येथील जागा हस्तांतरित

पुणे यांना राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना नाते, ता.महाड, जि.रायगड या इमारतीच्या बांधकामाकरिता हस्तांतरीत करण्याचे आदेश दिले आहेत. जिल्ह्यातील पशूधन विकासाच्या दृष्टीने पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या दूरदृष्टीमुळे हा एक महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

वाहनाच्या धडकेने पादचारी जखमी

दै.रायगड नगरी । पनवेल

एका भरधाव वाहनाच्या धडकेने पादचारी जखमी झाल्याची घटना मुंबई-पुणे एक्सप्रेस महामार्गावर पुणेकडे जाणाऱ्या लेनवर पनवेल जवळील ११/७०० कि.मी. जवळ घडली आहे.

कांतु रेड्डी या इसमास एका अज्ञात वाहनाची धडक बसली. त्यात तो गंभीररित्या जखमी झाला असून या घटनेनंतर सदर वाहन चालक आपले वाहन घेवून पसार झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

संत गाडगेबाबा यांचे विचार समाजाला योग्य दिशा व प्रेरणा देणारे : मंगेश वाघमारे

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

सम्यक क्रांती विचार मंच या संस्थेच्या वतीने संत गाडगे बाबा यांची १४५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. परळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच महेश ठाकूर, माजी उपसरपंच ऍड. प्रवीण कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपसरपंच महेश ठाकूर यांनी दीपप्रज्वलन केले. सम्यक क्रांती विचार मंचचे अध्यक्ष मंगेशभाऊ वाघमारे यांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यावेळी बोलताना मंगेशभाऊ वाघमारे यांनी सांगितले की, संत गाडगेबाबा यांनी जशी परिसरातील घाण स्वच्छ केली तशीच मनातील कुविचारांची घाण साफ केली. समाजाला अंधश्रद्धा मुक्त करण्यासाठी प्रयत्न केले. आपल्या परखड वाणीने समाजातील विषमता व अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी भजन कीर्तनाच्या माध्यमातून आयुष्यभर प्रयत्न केले. अनेक ठिकाणी धर्मशाळा स्थापन करून शिक्षणाचे महत्व सांगितले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची दखल घेत संत गाडगेबाबा यांनी निर्माण केलेल्या अनेक संस्था डा. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे सुपूर्त केल्या. तत्कालीन समाजात माजलेले कर्मकांड नष्ट करण्यासाठी संत गाडगेबाबा यांनी अपार मेहनत घेतली. आजही त्यांचे विचार समाजाला प्रेरणा देणारे आहेत. कोरोनामुळे निर्माण झालेली परिस्थिती पाहता स्वच्छतेचे महत्व किती आहे हे विषद झालेले आहे. समाजाला दिशा देणाऱ्या संत गाडगेबाबा यांच्यासारख्या महामानवांचे विचार समाजातील भावी पिढीला तारक ठरतील आणि म्हणूनच सम्यक क्रांती विचार मंच या संस्थेच्यावतीने बहुजन महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात येते. आम्ही विचारांचा जागर करण्यासाठी नेहमीच तत्पर आहोत. या कार्यक्रमाला ग्रामपंचायतीचे उपसरपंच महेश ठाकूर, एड, प्रवीण कुंभार, ग्रामसेवक ए. एम. खेडकर, पत्रकार निवास सोनावळे, बाळू करले, सचिन गायकवाड, राया पवार, विष्णू पवार, संतोष डाके, लक्ष्मण वाघमारे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मतदार याद्यांचा घोळामुळे विरोधक झालेत पुरते नामोहरम, प्रशासनाने राज्य निवडणूक आयोगाचा मागवला अभिप्राय

पोलादपूर नगरपंचायतीची दुसरी पंचवार्षिक निवडणूक

दै.रायगड नगरी । पोलादपूर

नगरपंचायत पोलादपूर आता दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीला सामोरी जात असताना नगरपंचायतीच्याच आवाहनानुसार मतदार याद्यामधील आक्षेप व सूचना २२ फेब्रुवारीपर्यंत मागविण्यात आल्या. मात्र, मतदार याद्यांमध्ये कमालीच्या त्रूटी आणि संशयास्पद बदल दिसून आल्याने विरोधक पुरते नामोहरम झाले आहेत. सत्ताधाऱ्यांच्या पथ्यावर हे बदल व त्रूटी पडणार असल्याने निष्पक्षपती निवडणूक होण्यासाठी प्रशासनाने राज्य निवडणूक आयोगाच्या अवर सचिवांचा अभिप्राय मागविल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

२०११ च्या राष्ट्रीय जनगणनेनुसार २०१४ मध्ये पोलादपूर ग्रामपंचायत आणि त्यानंतर झालेल्या पोलादपूर नगरपंचायतीच्या पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम २०१६ मध्ये पार पडला. यानंतर तब्बल पाच वर्षांनी पोलादपूर नगरपंचायतीची दुसरी पंचवार्षिक निवडणूक होऊ घातली असून कोरोना संसर्ग पार्श्वभूमीवर या निवडणुकीला विलंब होण्याची चिन्हे दिसून येत आहेत. २४ जानेवारी २०२१ रोजी पाच वर्षांचा कार्यकाळ संपल्याने नगरपंचायतीचा कार्यभार प्रशासक म्हणून महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी स्विकारल्यानंतरही बरखास्त नगरपंचायतीचे सदस्य व पदाधिकारी शहरातील अंदाजपत्रक आणि आर्थिक मंजूरी नसलेल्या विकासकामांचे नारळ फोडत असल्याचे दृश्य जागोजागी दिसूनही यावर आचारसंहिता नसल्याने अंकूश बसू शकला नाही. सध्या विरोधी पक्ष स्वतंत्र आणि छुप्या युतीच्या प्रयत्नातून मिळणाऱ्या यशाच्या शक्यता पडताळून पाहात असताना दुसरीकडे आक्षेप आणि तक्रारी करण्याकडे कोणाचाही कल दिसून न आल्याचा थेट भरघोस राजकीय फायदा विद्यमान सत्ताधाऱ्यांना मागील दोन निवडणुकांप्रमाणे मिळण्याचीच दाट लक्षणे दिसून येत आहेत.

काँग्रेस पक्षाने घेतलेल्या आक्षेपानुसार पोलादपूर शहरातील ५ हजार ६७२ मतदारांपैकी मतदार यादीतील रानबाजिरे व चोळईतील २०० मतदार संख्या कमी केल्यानंतर सद्यस्थितीत असलेली ५ हजार ६२ मतदार यादीचे प्रारूप पाहता सुमारे ३५० ते ४०० मतदारसंख्या कमी करण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. १७ प्रभागातील सुमारे २०० हून अधिक मतदारांची आक्षेपपत्र जोडण्यात आली आहेत, अशी माहिती माजी पं.स.सभापती दिलीप भागवत यांनी दिली. भारतीय जनता पक्षाचे शहरअध्यक्ष राजा दिक्षित आणि तालुकाअध्यक्ष प्रसन्ना पालांडे यांनी, मतदारांची नांवे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागामध्ये गेल्याबाबत नाराजी व्यक्त करून अनेक मतदारांची पत्र जोडून प्रभागातील बदल न करता मागील प्रमाणे पूर्वीच्याच प्रभागात नांव असण्याबाबतचे आवाहन केले आहे. मनसे शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांनी मतदार याद्यांच्या घोळाबाबत आक्षेप घेण्यासाठी प्रयत्न केला असता मतदारांकडून अपिल आवश्यक असल्याचे समजून आले. मात्र, जे मतदार वाहने आणि अन्य प्रलोभनांमुळे मतदार केंद्रांपर्यंत पोहोचतात. त्या मतदारांकडून अशी अपेक्षा बाळगणे म्हणजे घोळ कायम ठेवण्याची सरकारी मानसिकता असल्याचे द्योतक आहे. यामुळे मनसेकडून १५ फेब्रुवारी २०२१ रोजी जाहीर केलेली प्रारूप मतदार यादी मागे घेण्याची मागणी करताना कोणताही प्रकारे प्रभागरचनेत बदल नसताना मतदारांची नांवे अन्य प्रभागांमध्ये गेल्याचा आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

नगरपंचायत अधिनियमानुसार उमेदवार अन्य प्रभागातून आरक्षित जागेनुसार निवडणूक शकत असताना मतदारदेखील राहण्याच्या ठिकाणाऐवजी दुसऱ्याच प्रभागातून मतदान करण्याची परिस्थिती दिसून येणे,हा प्रकार निष्पक्षपाती मतदानाला अनुकूल नसून सद्यस्थितीत जर मतदान प्रक्रिया झाली तर लोकशाहीची चेष्टा होण्याची शक्यता असून गरज पडल्यास विरोधी पक्षाने न्यायालयात दाद न मागितल्यास गेल्या दोन निवडणुकांसारखाच निकाल पुन्हा दिसून येईल, असे मत महाड येथील कायदेतज्ज्ञ ॲड.राजेश जोशी यांनी प्रस्तुत प्रतिनिधीजवळ बोलताना व्यक्त केले आहे. दरम्यान, पोलादपूर नगरपंचायत प्रशासनाने गेल्या काही दिवसांत प्राप्त आक्षेप व तक्रारी तसेच सूचनांच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाच्या अवर सचिवांचा अभिप्राय मागविल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. यामध्ये दुबार मतदार, तिबार मतदारांची शक्यता लक्षात घेऊन मतदार संख्या कमी करण्याच्या प्रक्रियेची अपेक्षाही व्यक्त करण्यात आल्याची प्राथमिक माहिती देण्यात आली.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याकडून जातीय दंगा काबू योजनेची घेण्यात आली रंगीत तालीम

दै.रायगड नगरी । पनवेल

आज पनवेल तालुका पोलीस ठाण्याकडून जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम पोलीस उपायुक्त परिमंडळ २ चे शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

पनवेल तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील शेडुंग टोल नाका येथे जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. सदर दंगा काबू योजनेच्या रंगीत तालमीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर, पोलीस निरीक्षक खेडकर यांच्यासह ०३ सपोनि, ०२ पोउपनि, २२ पोलीस अंमलदार तसेच नवीन पनवेल येथील अग्निशमन दलाचे १ अधिकारी व ५ फायरमॅन टेंडर व्हेन व ऍम्ब्युलन्स तसेच झोन २ स्ट्रायकिंग चे ०८ पोलीस अंमलदार, नवीन पनवेल वाहतूक शाखेचे ०१ अधिकारी व ६ पोलीस अंमलदार असे हजर होते.

द्रोणागिरी नोड परिसरातील रस्त्यांच्या दुरुस्तीची मनसेची मागणी

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

सिडकोच्या व्यवस्थापकीय अभियंता यांनी खोपटा पुल ते नवघर गाव तसेच इतर द्रोणागिरी नोड परिसरातील रस्त्यांच्या दुरुस्तीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने या रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे.त्यामुळे अपघ-ाताचे प्रमाण ही वाढले आहे. तरी सिडकोच्या व्यवस्थापकीय अभियंताने द्रोणागिरी नोड परिसरातील रस्त्यांच्या दुरुस्तीकडे लक्ष केंद्रित करावे अशी मागणी मनसेच्या शिष्टमंडळाने द्रोणागिरी नोड येथील उप अभियंता भगवान साळवे यांच्या कडे दिलेल्या निवेदन पत्रकाव्दारे केली आहे.

मनसेचे नेते राज ठाकरे यांच्या आदेशाची अंमलबजावणी म्हणून निष्पाप प्रवाशी नागरीक, वाहन चालक यांच्या जिवीतास कारणीभूत ठरु पाहणाऱ्या द्रोणागिरी नोड परिसरातील रस्त्यांच्या निकूष्ठ दर्जाच्या कामासंदर्भात, दुरावस्थे संदर्भात उरण तालुक्यातील मनसेच्या शिष्टमंडळाने द्रोणागिरी नोड येथील उप अभियंता भगवान साळवे यांची भेट घेऊन रस्त्याच्या कामांसदर्भात आढावा घेतला.यावेळी मनसेचे उरण तालुका उपाध्यक्ष सत्यवान भगत यांनी उप अभियंता भगवान साळवे यांच्या निदर्शनास आणून देताना सांगितले की द्रोणागिरी नोड परिसरातील रस्त्यांची कामे ही निकुष्ट दर्जाची होत असल्याने रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडून अपघाताचे प्रमाण वाढत आहेत.

एकंदरीत रस्त्याच्या दुरावस्थेमुळे निष्पाप प्रवाशी नागरीक वाहन चालक यांना आपले प्राण गमवावे लागत आहे. तरी सदर रस्त्याच्या कामाची पाहणी करून खुड्डे मुक्त रस्ते करुन नवघर सर्कल या ठिकाणी गतिरोधक बसवासाठी पुढाकार घ्यावा. आणि दुतर्फा वरील, साईट पठीवरील वाढलेले गवत साफ करून लावण्यात आलेल्या झाडांची निगा राखावी अशी मागणी ही केली आहे. यावेळी राकेश भोईर, विभाग अध्यक्ष दिपक पाटील, बबन ठाकूर, भुषण म्हात्रे सह मनसेचे सैनिक उपस्थित होते.उप अभियंता भगवान साळवे यांनी रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले.

गोरेगांव पोलिसांनी पुरार येथे ११०० किलो बैलाचा मांस केले जप्त ; दोघांना अटक

दै.रायगड नगरी । गोरेगांव /रोहिदास नगर

पुरार येथे गोवंश जातीच्या बैलांची अमानुषपणे कत्तल करून मांस विक्री करण्यासाठी घेवून जाणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर गोरेगांव पोलिस ठाण्याचे पथक घटना स्थळी दाखल होवून ११०० किलो बैलाचा मांस तसेच १ बैलाची सुटका करण्यात यश आले असून आरोपी तसेच मांसासाठी वापरण्यात येणारे वाहन जप्त करण्यात आले आहे.

या संदर्भात गोरेगांव पोलिसां कडून मिळालेल्या माहिती नुसार गोरेगांव पासून ४ ते ५ कि.मी.अंतरावर असणाऱ्या पुरार येथील मशिदीजवळ आरोपीच्या घराच्या मागच्या बाजुला मोकळ्या जा-गेत ८ बैलांची अमानूषपणे हत्या करुन मांसाचे मोठे तुकडे पोत्यामधून भरून विक्रीसाठी घेवून जाणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळताच आज दि २३/२/२०२१ रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास गोरेगांव पोलिस ठाण्याचे चार्ज पोलिस निरीक्षक श्री. पी. बी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सोना-वणे, पो.ह समेळ, पो.ह.यशवंत चव्हाण, कोळेकर आदींसह अन्य पोलिस कर्मचाऱ्यांनी पुरार येथील मशिदीच्या मागे आरोपीच्या घराच्या मोकळ्या जागेत छापा मारला असता बैलांची हत्या करुन मांसाचे तुकडे पिशव्यामध्ये भरलेले व जमिनीवर काही मोठे मांसाचे तुकडे तसेच आरोपी हे अमानुषपणे बैलांची हत्या करुन विक्रीसाठी धारदार हत्यारांनी मांसाचे तुकडे करीत होते दरम्यान पोलिसांच्या निदर्शनास येताच पोलिसांनी झडप टाकून दोन आरोपींनी ताब्यात घेत त्यांच्या कडून ११०० किलो मांस तसेच एक मॅक्झिमो गाडी तसेच निळ्या रंगाचा आयताकृती इलेक्ट्रॉनिक वजन काटा असा अंदाजे ६३३००० रुपयांचा माल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

ॲड.पूजा म. कंदाडे

जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात, पनवेल

इतर चौ.अर्ज क्र.८०८/२०२०

नि.नं.७/ड

ने.ता.०८/०४/२०२१

अब्दुल अजिज हुसेन मिया बुबेरे
वय : ६१ वर्षे, व्यवसाय : काहीनाही
राहणार : रु.नं.५०३, ५ वा मजला,
सारा कॉम्प्लेक्स, बी विंग, मुंबई पुणे रोड,
विशाल हॉटेल जवळ, भारत गियर कंपनी,
शिवली नगर, मुंब्रा, ठाणे ४००६१२ अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार अब्दुल अजिज हुसेन मिया बुबेरे यांचा दि.१५ ऑक्टोबर १९५९ रोजी घर नं.९० क, तळोजा गाव, तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेला असून अर्जदार याने निर्धारित कालावधीत त्याच्या जन्माची नोंद संबंधित दप्तरी न केल्यामुळे तसा जन्माचा दाखला संबंधित विभागाकडून प्राप्त झाला नाही. त्याकामी अर्जदार यांनी मा.न्यायालयात महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम १९७६ कलम १० (२) जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सं.१८ भारत सरकार) कलम १३ (३) कलम ३० मधील तरतुदीनुसार अर्जदार अब्दुल अजिज हुसेन मिया बुबेरे यांचे जन्माचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, सदरहू नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदाराने वरील प्रमाणे केलेल्या अर्जासंबंधी ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत पुराव्यासहीत मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावे. याबद्दल कोणाचीही हरकत दाखल झाली नसल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे उक्त अर्ज निकाली काढून तसा आदेश अर्जदाराच्या लाभांत करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.१२ माहे ०२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि. व फौ.न्या.पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि. व फौ.न्या.पनवेल

मा.मुजावर साहेब
वकील : मनोज वारंगे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.६०/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.०७/०४/२०२१

१) श्रीमती.आशाबाई उर्फ अनुसया बाबुराव पाटील
२) श्री.दत्तात्रेय बाबुराव पाटील
३) श्री.निवास बाबुराव पाटील
४) श्रीमती.कांता पांडुरंग पाटील
सर्व रा.अपार्टमेंट नं.के.एल.२/६/१, प्लॉट नं.२,
सेक्टर ५, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
नवी मुंबई ४१०२१८ अर्जदार

अर्जदार क्रं.१ चे पती आणि अर्जदार क्र.२, ३ आणि ४ यांचे वडील मयत कै.श्री.बाबुराव केशव पाटील राहणार के.एल.२/६/१, प्लॉट नं.२, सेक्टर ५, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई ४१०२१८ यांचे दिनांक २७/०१/२०२० रोजी असविनी हॉस्पिटल मुंबई, महाराष्ट्र येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :

मिळकतीचे वर्णन

अपार्टमेंट नं.के.एल.२/६/१, सेक्टर ५, कळंबोली, तळमजल्यावरील बांधीव क्षेत्र २१.००७ चौ.मी, बिल्डींग नं.के. एल.२/६, प्लॉट नं.५/२, सेक्टर ५, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई ४१०२०१८

किंमत रुपये २६,०००/-

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/२/२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.मुजावर साहेब
वकील : मनोज वारंगे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.५६/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.०६/०४/२०२१

१) श्रीमती.सोसाम्मा पोरुनाल्लोर फिलिपोसे
रा.फ्लॅट नं.१०३, श्री गणेश लोक सी.एच.एस.लि.,
प्लॉट नं.२२२-२२३, सेक्टर १०, न्यू पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
२) सौ.जिन्सी रोहित कोशी तर्फे कुलमुखत्यारी
श्रीमती.सोसाम्मा पोरुनाल्लोर फिलिपोसे
रा.सी जी ३, पार्श्व लाभ सी.एच.एस.लि.,
मीना नगर, दिवानमन, उमेले, बासिन रोड,
पालघर, वसई वेस्ट, महाराष्ट्र ४०१२०२
३) सौ.र्मसी ॲलिया चौगले उर्फ कुलमुखत्यारी
श्रीमती.सोसाम्मा पोरुनाल्लोर फिलिपोसे
रा.फ्लॅट नं.१०३, श्री गणेश लोक सी.एच.एस.लि.,
प्लॉट नं.२२२-२२३, सेक्टर १०, न्यू पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार

अर्जदार क्रं.१ चे पती आणि अर्जदार क्रं.२, आणि ३ यांचे वडील मयत कै.श्री.पोरुनाल्लोर मथाई फिलिपोसे राहणार फ्लॅट नं.१०३, श्री गणेश लोक सी.एच.एस. लि., प्लॉट नं.२२२-२२३, सेक्टर १०, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांचे दि.२०/०४/२०१५ रोजी डॉ. डी.वाय.पाटील कॉलेज हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, नेरुळ, नवी मुंबई येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :

मिळकतीचे वर्णन

फ्लॅट नं.१०३, १ ला मजला, क्षेत्र ५१६ चौ.फूट चटई क्षेत्र, श्री गणेश लोक को.ऑप.हौ.सोसायटी लि, प्लॉट नं.२२२ आणि २२३ सेक्टर १०, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई ४१०२०६

किंमत रुपये ५,१६,०००/-

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/२/२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, १) श्री.पंढरीनाथ दत्तात्रय चोरघे, २) श्री.बाबुराव शंकर पाटील, ३) श्री.रघुनाथ हिरु म्हात्रे, ४) श्री.सचिन अंबाजी म्हात्रे यांच्या सामायिक अविभक्त मालकी, ताबेकब्जा, कसवणूक, वहिवाटीतील खाली नमूद केलेली जमीन मिळकत येथे नमूद केलेल्या मालकांकडून आमचे अशिल यांनी कायम खरेदी घेण्याचा व्यवहार पक्का केला आहे.

मौजे : पोयंजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

गट/सर्व्हे नंबर	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकारणी रु.पैसे
३७ (जुना नं.२०)	१-३०-८० पो.ख. ०-२९-८० एकूण १-६०-६० **पैकी १) श्री.पंढरीनाथ दत्तात्रय चोरघे ०-२५-० (हे.आर.चौ.मी.)** **२) श्री.बाबुराव शंकर पाटील व श्री.रघुनाथ हिरु म्हात्रे या दोघांचे एकत्रित क्षेत्र ०-२०-० (हे.आर.चौ.मी.)** **३) श्री.सचिन अंबाजी म्हात्रे क्षेत्र ०-२०-० (हे.आर.चौ.मी.) यांच्या सामायिक अविभक्त मालकी, ताबेकब्जा, कसवणूक, वहिवाटीतील एवढे क्षेत्र**	४.१६

तरी वर नमूद मिळकतीबाबत येथे वर नमूद जमीन मिळकतीचे मालक यांचेव्यतिरिक्त अन्य कोणाचेही गहाण, दान, बोजा, बक्षिसपत्र, संमतीपत्र, वचनचिठ्ठी, साठेकरार, फरोक्तखत, ट्रस्ट डीड, पोटगी, वारसा, अदला-बदली, वचनचिठ्ठी, संमतीपत्र, भाडेपट्टा, वहिवाट, अन्य कोणताही करार-मदार इत्यादी कोणत्याही प्रकारचे दस्ताने कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, इतर हक्क-अधिकार, ताबाकब्जा, वहिवाट इत्यादी असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे समक्ष भेटून अथवा त्यांच्या खाली नमूद पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे असे समजण्यात येवून आमचे अशिल सदर जमीन मिळकतीबाबतचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. सदर वर नमूद केलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.२५/०२/२०२१

सही/-
ॲड.महेश नरहरी देशमुख
ॲड.अमर पटवर्धन
ऑफिस नं.०१, तळमजला,
यशोकिरण को.ऑप.हौ.सो.लि.,
स्वातंत्र्यवीर सावरकर चौकाजवळ,
पनवेल, तालुका : पनवेल,
जिल्हा : रायगड-४१०२०६

संक्षिप्त...

वै. श्री. सद्गुरू गणपतबाबा अलिबाकर महाराज यांचा ५३ वा पुण्यस्मरण सोहळा

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

वै.श्री. सद्गुरू गणपतबाबा अलिबागकर महाराज श्रीक्षेत्र पंढरपूर यांचा त्रेपन्नावा (५३)वा पुण्यस्मरण सोहळा मिती माघ वद्य २शके १९४२सोमवार दि.०१/०३/२०२१रोजी वै.सद्गुरू अलिबाकर महाराज मठ,कासार घाट, श्रीक्षेत्र पंढरपूर येथे संपन्न होणार आहे. या पुण्यस्मरण उत्सवा निमित्ताने अखंड विश्वशांती हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार असून मिती माघ शुद्ध १० शके १९४२ मंगळवार दि.२२/२/२१ ते माघ वद्य ४ मंगळवार दि.२/३/२१ पर्यंत साजरा होणार असुन यानिमित्ताने पहाटे ४ते ६ श्रीची काकडा आरती भजन,६.३० ते ८.३० नित्य पूजा,९ ते १२.३० जगद्गुरू श्री. तुकाराम महाराज गाथ्यावरील भजन,दुपारी १ते ४ भोजन व विश्रांती,सायं. ४ ते ५ प्रवचन,५ ते ६.३० वा. हरिपाठ,७ ते ९ हरी किर्तन व नंतर जागरण असा कार्यक्रम होईल. तसेच मिती माघ वद्य २ शके १९४२ सोमवार दि.१/३/२०२१ रोजी मुख्य दिवशी सकाळी पहाटे महाराज्यांच्या पुण्यस्मरणा निमित्त श्रींची महापूजा व अभिषक, सकाळी ८ते १० दिंडी प्रदक्षिणा,१०.३० ते १२.३० पुण्यस्मरणानिमित्त किर्तन,मिती माघ वद्य ४ शके १९४२ मंगळवार दि.२/३/२०२१ रोजी सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन यांनी कार्यक्रमाची सांगता होणार असुन तरी सर्व भाविकांनी सर्व कार्यक्रमाला उपस्थित राहून श्री सद्गुरूंची सेवा करुन कृतार्थ व्हावे अशी विनंती ह. भ.प.नारायणदादा गोपाळबुवा (वाजे)अलिबागकर महाराज यांनी केली आहे.

खारघर हिल आदिवासी वाड्यात विकासकामांचे पर्व

दै.रायगड नगरी । पनवेल

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व सभागृहनेते पनवेल महानगरपालिका परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग पाच मधील चाफेवाडी व फणसवाडी (आदिवासी वाडया) येथे आरसीसी टाक्या बांधण्याचा शुभारंभ स्थानिक नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे यांनी नारळ वाढवून केला.

याप्रसंगी पनवेल महानगरपालिका महापौर सन्माननीय डॉ. कविता चौतमोल, खारघर तळोजा मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, अ प्रभाग समिती सभापती अनिता पाटील, नगरसेविका हर्षदा उपाध्याय, नगरसेवक रामजीभाई बेरा, युवा सरचिटणीस अमर उपाध्याय व प्रभाग चार चे अध्यक्ष वासुदेव पाटील व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत हा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील

दै.रायगड नगरी । पनवेल

पत्रकारिता क्षेत्रासोबत सातत्याने सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांची सर्वानुमते पुनर्निवड झाली आहे.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचची वार्षिक सर्वसाधारण बैठक आज (बुधवार, दि. २४) पार पडली. यावेळी सन २०२१-२२ सालाकरिता कार्यकारिणीची बिनविरोध जाहीर झाली. त्यानुसार अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, सरचिटणीसपदी मंदार दोंदे, उपाध्यक्षपदी हरेश साठे, खजिनदारपदी नितिन कोळी, कार्यकारिणी सदस्य म्हणून अविनाश कोळी, विवेक पाटील, संजय कदम, प्रशांत शेडगे, अनिल भोळे, प्रविण मोहोकर, राजू गाडे, दीपक घोसाळकर, तृप्ती पालकर, अनिल कुरघोडे हे जबाबदारी पार पडणार आहेत.

यावेळी अध्यक्ष माधव पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हंटले कि, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच गेल्या सोळा वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून फक्त पत्रकारिता नाही तर शैक्षणिक आणि सामाजिक कार्य करीत आहे.दरवर्षी विविध शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याबरोबरच शाळांना डिटीजल करण्याच्या दृष्टीने प्रोजेक्टर संच देण्याचे महत्वपूर्ण काम झाले आहे. कुष्ठरुग्णांसोबत दिवाळी साजरी करणे, कर्तृत्वान महिलांचा सत्कार, मातृभाषा दिन, ब्लँकेटचे वाटप, अशी व इतर उपक्रमे वर्षभरात होत असतात. मागील वर्षात कोरोना काळातही पनवेल तालुका पत्रकार विकास मंच थांबले नाही, दुर्गम भागात जाऊन नागरिकांना अन्नधान्य तसेच सॅनिटायझरचे वाटप केले, असे नमूद करून यापुढेही सामाजिक व शैक्षणिक उपक्रमे मोठ्या प्रमाणात राबविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वाढता कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी जनतेने काळजी घेण्यासाठी म्हसळा नगरपंचायतीने फिरवली दवंडी

नियम न पाळणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार

दै.रायगड नगरी । म्हसळा

महाराष्ट्र राज्यात कमी झालेला कोरोना प्रादुर्भाव पुन्हा वाढु लागल्याने लॉकडाऊन करण्याची वेळ येवु नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून जनतेने कोरोना बाबतीत काळजी घ्यावी असे जाहीर आवाहन राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनी वार्तालाप करताना सांगितले आहे. त्यानुसार जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांना नियम न पाळणाऱ्यांवर कडक निर्बंध घालावेत असे आदेशानुसार रायगड जिल्हा अधिकारी निधी चौधरी यांनी तालुक्यातील स्थानिक संस्थाना लेखी आदेश काढले वरून म्हसळा नगरपंचायतीने शहरात दवंडी देवुन कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी घ्यावयाची आवश्यक ती काळजी व नियम पाळावेत अन्यथा मोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. घराबाहेर पडल्यास मास्क लावणे, गर्दी न करणे, सुरक्षित अंतर राखणे,वेळोवेळी हात स्वच्छ धुणे, सॅनिटायझरचा वापर करणे आवश्यक आहे तसेच बाजरापेठेत वस्तू खरेदी करण्यासाठी गेल्यास दुकानात गर्दी करू नये, गर्दी केल्यास किंवा सुरक्षित अंतर न राखल्यास दुकानदार आणि ग्राहक दोघांवरही कारवाई करण्याची सुचना म्हसळा नगर पंचायत प्रशासनाने दवंडी देताना दिल्या आहेत.

कोरोना प्रादुर्भाव लॉककडाऊन कालावधीत महाराष्ट्र राज्याने प्रादुर्भाव रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात यश मिळवले होते आणि हळूहळू संपुर्ण राज्यात अनलॉक प्रकिया सुरू केली होती.वर्षभर बंद असलेली मुंबईची लाइफलाईन लोकल ट्रेन सेवा सुरू झाली असे असले तरी कोरोनाचा समुळ नायनाट झाला नसल्याने शासनाने जनतेला नियम पाळुन योग्य ती खबरदारी घ्यावी असे निर्बंध घातले होते. परंतु कोरोना गेलाच अशा आविर्भावात जनता राहु लागल्याने कोरोनाने पुन्हा डोके वर काढले आसुन बाधित रुग्ण संख्या वाढत चालली आहे आणि पुन्हा महाराष्ट्र शासनावर लॉकडाऊन करण्याची वेळ आली असल्याचे वारंवार उल्लेख करून सांगावे लागत आहे. १५ तारखेला सुरू झालेले कॉलेज,महाविद्यालय अवघ्या ७ दिवसात बंद करण्याचे आदेश राज्याचे शिक्षण मंत्रालयाने दिले आहेत. सद्या २८ फेब्रुवारी पर्यंत महाविद्यालय बंद करून ऑनलाईन शिक्षण पद्धती सुरू ठेवण्यात आली आहे. १ मार्च पासुन संपुर्ण राज्यात लॉक डाऊन होणार असल्याच्या अफवाना उत आला आहे. त्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नव्याने लॉकडाऊन बाबत एकमेकांकडे चर्चा करताना लोक बाजारात निदर्शनास येत आहेत.

दागिने पॉलिश करून देतो असे सांगून महिलेची केली फसवणूक

दै.रायगड नगरी । पनवेल

दागिने पॉलिश करून देतो असे सांगून एका महिलेकडे असलेले ४० हजार रुपये किंमतीचे दागिने लंपास केल्याची घटना तालुक्यातील तळोजा परिसरात घडली आहे.

तळोजा परिसरात राहणाऱ्या दर्शना पाटील (३४) यांच्याकडे काही भामटे गेले व तुमच्याकडे असलेले दागिने चमकवून देतो असे सांगून त्यांच्याकडे असलेले ४० हजार रुपये किंमतीचे दागिने स्टीलच्या डब्यात टाकण्यास सांगितले व डब्यात पाणी हळद, मीठ टाकून १५ मिनिटानंतर डबा उघडण्यास सांगून हातचलाखीने सदर दागिने लंपास करून ते तेथून निघून गेले. १५ मिनिटाने दर्शना पाटील यांनी डबा उघडला असता त्यांना डब्यात दागिने आढळून आले नाहीत. आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

ग्रामपंचायत कोळखे

सफाई कामगार भरती

अ.क्र.	ग्रा.पं.चे नाव	भरावयाचे पदाचे नाव	पद संख्या	शैक्षणिक अर्हता
१	कोळखे	सफाई कामगार	२	४ थी पास/नापास

वरील प्रमाणे ग्रामपंचायत कोळखेमध्ये सफाई कामगार भरती करण्याकरिता जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसापर्यंत अर्ज खालील अटी शर्तीस अधिन राहून मागविण्यात येत आहेत.

१) उमेदवार हा ४ थी पास/नापास असावा.

२) उमेदवार हा स्थानिक गावातील रहिवाशी असावा.

३) सदरची नेमणूक ही कंत्राटी पद्धतीने केली जाईल.

४) उमेदवार निवडीचे सर्व अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवलेले आहेत.

५) सदरची जाहिरात रद्द करण्याचे किंवा फेरबदल करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आाहेत.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत कोळखे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत कोळखे

नमुना-७

नियम १२ (२) (क) पहा

जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची उद्घोषणा व लेखी नोटीस

ज्याअर्थी मे.स्वप्नपूर्ती होम्स प्रायव्हेड, नोंदणीकृत प्रायव्हेट लि. कंपनी दुकान क्रं.२४, हरी आशिर्वाद बिल्डींग, भूखंड क्रं.१५ ए, आंध्रा बँकेजवळ, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून मा.जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचेकडील आदेशानुसार एकूण १५३ प्रकरणात थकीत रक्कम **रु.९,३५,१३,१६५/- (अक्षरी रुपये नऊ कोटी पस्तीस लाख तेरा हजार एकशे पासष्ट मात्र)** रक्कम वसूल करणेकामी मौजे : हरिग्राम, १) स.नं.१३/२अ, क्षेत्र २४०० चौ.मी., २) स.नं.१३/२ब, क्षेत्र २४०० चौ.मी., ३) स.नं.१३/२ क, क्षेत्र २७०० चौ.मी., मौजे : नेरे, स.नं.१७८/२अ/१, क्षेत्र १५८० चौ.मी., मौजे : विहिघर स.नं.१३/० एकूण क्षेत्र ००-७१-३० हे.आर.पैकी क्षेत्र ०-३५-३० हे.आर. ही स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी याद्वारे नोटीस देण्यात येते की, यामध्ये विक्रीसाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी पूर्वाक्त रक्कम **रु.९,३५,१३,१६५/-(अक्षरी रुपये नऊ कोटी पस्तीस लाख तेरा हजार एकशे पासष्ट मात्र)** देण्यात आली नाही तर खालील नमूद स्थावर मालमत्ता मौजे : हरिग्राम, ता.पनवेल स.नं.१३/२अ, १३/२ब व १३/२क या ठिकाणी **दिनांक २५/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता** जाहीर लिलावाद्वारे तहसीलदार पनवेल यांचे कार्यालयाद्वारे विकण्यात येईल. ही विक्री उक्त मालमत्तेमधील उक्त कसूरदाराचा अधिकार, हक्क व हितसंबंध यांनाच केवळ लागू होते.

स्थावर मालमत्तेचा तपशिल		क्षेत्र	सरकारी किंमत (प्रती गुंठा)
(१)	(२)	(३)	(४)
१) हरिग्राम	१३/२अ	२४०० चौ.मी.	४,१०,०००/-
२) हरिग्राम	१३/२ब	२४०० चौ.मी.	४,१०,०००/-
३) हरिग्राम	१३/२क	२७०० चौ.मी.	४,१०,०००/-
४) नेरे	१७८/२अ/१	१५८० चौ.मी.	४,४२,०००/-
५) विहिघर	१३	००-३५-३० हे.आर.	४,१०,०००/-

अ) लिलावाची प्रक्रिया

१) लिलावात कोणास भाग घेता येईल :

अ) भारतीय नागरिकांना असलेली कोणतीही व्यक्ती किंवा भारतात नोंदणी असलेली भागीदारी संस्था/कंपनी इत्यादी.

ब) काळ्या यादीमध्ये नाव असणाऱ्या व्यक्ती/संस्था अथवा कंपनीस लिलावात भाग घेता येणार नाही.

२) लिलावात भाग घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :

अ) संस्था/कंपनी नोंदणीचे प्रमाणपत्र

ब) पॅनकार्ड व आयटी रिटर्नस् (मागील ३ वर्षाचे)

ब) लिलावाची दिनांक : २५/०३/२०२१

क) लिलावाची वेळ : सकाळी ११.०० वा.

ड) लिलावाचे ठिकाण : मौजे : हरिग्राम, ता.पनवेल स.नं.१३/२अ,१३/२ब व १३/२क

इ) मालमत्ता पाहण्याची प्रक्रिया : या कार्यालयाकडून जप्त करण्यात आलेली मालमत्ता दाखविणेकामी या कार्यालयातील कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच जागा पाहण्याची प्रक्रिया दिनांक १५ मार्च २०२१ ते २४ मार्च २०२१ या कालावधीमध्ये (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते ३.०० या वेळेत उपलब्ध राहील.

ई) लिलावाच्या अटी व शर्ती

१) सदर लिलाव प्रक्रियेमध्ये जाहीर बोली पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. लिलावात जाहीर बोलीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उच्चतम बोली असणाऱ्या बोली धारकास अंतिम बोली धारक समजण्यात येईल.

२) प्रत्यक्ष लिलावाच्या वेळी मिान ३ खरेदीदारांनी बोली लावणे बंधनकारक आहे. तीनपेक्षा कमी खरेदीदार उपस्थित असल्यास लिलाव त्या दिवशी रद्द करण्यात येईल व लिलावाची पुढील तारीख तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचे निर्देशानुसार ठरविण्यात येईल.

३) लिलावात भाग घेवू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्ती/संस्थेकडील आयकर विभागाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक असून मागील वर्षी दाखल केलेल्या रिटर्नची प्रत दाखल करावी लागेल. लिलाव स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे तसेच लिलावाच्या जाहीर प्रकटनामध्ये कोणताही बदल करण्याचे अधिकार तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडील राहतील.

४) लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला अनामत रक्कम म्हणून १ लक्ष रुपये रक्कम धनाकर्षाद्वारे लिलावाच्या दिनांकास १ दिवस अगोदर ''OFFICE OF THE TAHSILDAR PANVEL'' यांचे नावे पे-ऑर्डर या कार्यालयात सादर करावी लागेल. लिलाव धारकाने लिलावात अनामत ठेवलेली रक्कम लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीने योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यानंतर संबंधित लिलावधारकास त्यांची अनामत ठेवलेली रक्कम परत करण्यात येईल.

५) लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमधील तरतुदीनुसार लागू असलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

६) लिलावासाठी एकूण किंमतीच्या रकान्यात दर्शविण्यात आलेल्या अपसेट प्राइज (एकूण सरासरी किंमत) पेक्षा अधिक बोलीने लिलावास सुरूवात करण्यात येइल. तसेच बोली बोलताना बोली रक्कम रुपये ५०,०००/- च्या पटीत बोलावी लागेल.

७) लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीची रक्कम प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास सदर मालमत्तेचा ३० दिवसांच्या आत फेर लिलाव करण्यात येईल.

८) लिलावाने घ्यावयाच्या स्थावर मालमत्तेची खात्री करून घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकावर राहील. तसेच सदरील मालमत्तेची पाहणी व खात्री स्वतःच्या जबाबदारीवर करावी. त्यासाठी तहसीलदार पनवेल यांचे कार्यालयाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. सहकार्यासाठी तहसीलदार पनवेल दूरध्वनी क्र.०२२-२७४५२३९९ व Email : tahasilpanvel@gmail.com वर संपर्क साधावा.

९) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २०१ अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या सर्व बाबतीत, खरेदीदार म्हणून जाहीर केलेल्या व्यक्तीस त्याने बोली केलेल्या रक्कमेच्या पंचवीस टक्के (२५%) अनामत रक्कम त्याच दिवशी लिलावाच्या ठिकाणी शासनजमा करावी. आणि अशी रक्कम अनामत ठेवण्यास कसूर केल्यास, उक्त मालमत्ता ताबडतोब पुन्हा विक्रीसाठी काढण्यात येईल व तिची विक्री करण्यात येईल. सदर रक्कम भरणेस कसुरी केल्यास सदरील बोलीधारकाची अनामत रक्कम जप्त करून शासनजमा करण्यात येईल व बोलीधारक क्र.२ यांना सर्वोच्च बोलीच्या किंमतीत मालमत्ता घेणेबाबत प्राधान्य व संधी दिली जाईल. अनामत रक्कम भरण्यास कसूर केल्यास संबंधितांविरुद्ध इंडियन पिनल कोड कलम १८५ अन्वये खटला दाखल करण्यात येईल.

१०) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २०२ अन्वये खरेदीदार खरेदीची उर्वरित पंच्याहत्तर टक्के (७५%) रक्कम स्थावर मालमत्तेची विक्री ज्या दिनांकास झाली असेल त्या दिनांकापासून दोन महिन्याची मुदत संपण्यापूर्वी किंवा कायम केल्याची सूचना खरेदीदारास ज्या दिनांकास मिळाली असेल त्या दिनांकापासून पंधरा दिवसाची मुदत संपण्यापूर्वी, यापैकी जी मुदत अगोदरची असेल त्या मुदतीपूर्वी भरावी लागेल. तथापी असा अखेरचा दिवस रविवार किंवा इतर अधिकृत सुट्टीचा दिवस असेल तर रक्कमेचा भरणा त्यालगतच्या कार्यालयीन दिवसाच्या सुर्यास्ताच्या आत करावा.

११) लिलावाची सर्वोच्च बोली स्वीकारण्यानंतर व पंचवीस टक्के (२५%) रक्कम भरल्यानंतर बोलीची उर्वरित रक्कम लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या पंच्याहत्तर टक्के (७५%) रक्कम भरण्यात येईल अशा हमीचे दायित्व स्वीकारणाऱ्या दोन व्यक्तींसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रु.१००/- इतक्या मुद्रांकित (स्टँप पेपर) कागदावर करारनामा/शपथपत्र करून देईल, असे करारनामा/शपथपत्र करून न दिल्यास बोलीधारकाने भरलेली पंचवीस टक्के (२५%) रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित मालमत्तेचा फेरलिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरीलप्रमाणे करारपत्र न कोल्याच्या परिणामी मालमत्तेचा फेरलिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरीलप्रमाणे करारपत्र न केल्याचा परिणामी लिलावधारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रक्कमेपैकी अ.क्र.०९ प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहिलेली पंच्याहत्तर टक्के (७५%) रक्कम भरल्यानंतर व करारपत्रक केल्यानंतर त्याला सदरील मालमत्तेचा ताबा देण्यात येईल. सदरील रक्कम ''OFFICE OF THE TAHSILDAR PANVEL'' यांचे नावे पे-ऑर्डर या कार्यालयात जमा करावी.

१२) जागेच्या मालकीबाबत न्यायालयीन वाद, मालकी व दायित्वाबाबत आणखी खात्री निविदाधारकाने त्यांचे स्तरावरून करण्यात यावी. तसेच ज्यांच्या नावे अंतिम लिलाव मंजूर करण्यात येईल, त्या लिलाव धारकास सदर मालमत्ता त्यांचे नावे करण्यासाठी लागणारी स्टँप ड्युटीची व इतर संबंधित कराची रक्कम स्वतः भरणा करावी लागेल.

१३) लिलावधारकाने संपूर्ण रक्कम अटीप्रमाणे वेळेत भरणा करून लिलावधारकाने मालमत्तेचा ताबा घेण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. लिलावधारकाने वेळेत सदरील मालमत्तेचा ताबा न घेतल्यास त्यामुळे उद्भवणाऱ्या तांत्रिक बाबी बाबत लिलावधारक स्वतः जबाबदार राहील.

१४) लिलावासाठी येणारा खर्च लिलावाची बोली घेणाऱ्यावर लादला जाईल. (उदा.जाहिरात खर्च इ.)

१५) सदरील मालमत्तेच्या लिलावाबाबत अथवा त्या अनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, शासन ज्ञापन, शासन निर्णयातील ज्या तरतुदींशी विसंगत अशा प्रकरणी तरतूदी या शासन निर्णयातील अंतिम समजून त्यानुसार कार्यवाही/अंमलबजावणी करण्यात येईल.

१६) लिलावधारकास शासनाने वेळोवेळी विहित केलेले कर अदा करावे लागतील.

१७) लिलावातील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारावयाचा किंवा नाकारावयाचा अंतिम निर्णय हा तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचा राहील.

१८) जागेची स्थिती व विक्री वेळेची स्थिती आहे, त्या स्थितीत ते खरेदीदाराने स्वीकृत करणे व विक्रीबाबत तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांच्या अंतिम मंजूरीनंतर आहे त्या स्थितीत व जागेवर कागदोपत्री व प्रत्यक्ष ताबा मुदतीत घेणेची सर्वतोपरी जबाबदारी ही खरेदीधारकाची असेल.

१९) लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व लिलावधारकाने संपूर्ण रक्कम शासनजमा केल्यानंतर १५ दिवसांचे आत जागेचा ताबा या कार्यालयामार्फत दिला जाईल.

२०) सदरचे जाहीर प्रगटन हे मा.जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग, यांचे कार्यालयाच्या raigad.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले असून मा.जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग, हिराकोट तळ्याजवळ मु.पो.अलिबाग, जि.रायगड यांचे कार्यालयात, मा.उपविभागीय अधिकारी, पनवेल उपविभाग पनवेल, तसेच तहसीलदार कार्यालय पनवेल जुना ठाणा नाका ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांचे कार्यालयामार्फत व मौजे हरिग्राम, स.नं.१३/२अ, १३/२ब, १३/२क, मौजे : नेरे स.नं.१७८/२अ/१, मौजे : विहिघार स.नं.१३ येथे प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

२१) लिलाव प्रक्रियेच्या खर्चाची रक्कम लिलाव खरेदी करणाऱ्यास अदा करावी लागेल.

२२) लिलावाच्या प्रक्रियेमध्ये काही आवश्यक अटी/शर्ती समाविष्ट करणे वा शिथील करणेचा संपूर्ण अधिकार/हक्क निम्नस्वाक्षरीदारांचा राहील.

२३) कोणतेही कारण न देता लिलाव रद्द करण्याचा/तहकूब करण्याचा अधिकार तहसीलदार पनवेल यांनी राखून ठेवला आहे. तसेच प्रकरणी तहसीलदार पनवेल यांचा निर्णय अंतिम राहील.

ठिकाण : तहसीलदार कार्यालय, पनवेल
दिनांक : २३/०२/२०२१

सही/-
तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पनवेल